# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u>** :- नागपूर शहरातील म.न.पा. च्या विविध उद्यानात ग्रीन जिम साहित्यांची दुरुस्ती करणेबाबत.

**{उद्यान व वृक्ष प्रा. विभाग }**

नागपुर शहरातील झोन क्र.01 ते 10 अंतर्गत म.न.पा. च्या विविध उद्यानात ग्रीन जीम साहित्य लावण्यात आलेली आहेत. या सर्व ग्रीन जीम साहित्यांचा देखभाल कालावधी संपुष्टात आलेला आहे. त्यामुळे या साहित्यांची देखभाल व दुरुस्ती विभागाकडून करणे आवश्यक आहे.

सदर ग्रीन जीम दुरुस्ती करण्याच्या कामाची निविदा मागविली असता निविदाकार मे. रचित सेल्स, नागपूर यांची प्राकलनीय दरापेक्षा १३.२०% टक्के कमी दरांची रु. ६६,०६,४७७/- किमतीची निम्नतम निविदेला मंजुरी प्रदान करण्यात आली.

या कामाचे कंत्राटदार मे. रचित सेल्स, नागपूर यांनी दि.११/०३/२०२५ पर्यंत झोन क्र.०१ ते १० अंतर्गत म.न.पा. च्या विविध उद्यानातील ग्रीन जीम साहित्य दुरुस्ती करण्याचे काम पूर्ण केलेले आहे. सदर कामाचा कार्यादेश कालावधी पूर्ण झालेला आहे. ग्रीन जीम दुरुस्तीच्या कामाचे नवीन कंत्राट मंजूर होऊन कार्यादेश होईपर्यत या साहित्यांची देखभाल व दुरुस्ती विभागाकडून करणे आवश्यक आहे. त्या करिता ६ महिन्यासाठी अंदाजे राशी रु. ३३,८३,५९५/- चे प्राकलन तयार करण्यात आले असून पद क्र. A26001630803 अंतर्गत प्रावधान देण्यात आले आहे.

करिता झोन क्र. ०१ ते १० अंतर्गत म.न.पा. च्या विविध ग्रीन जीम साहित्यांची देखभाल व दुरुस्ती करण्याचे कामाकरिता लागणाऱ्या राशी रु.३३,८३,५९५/- (जी. एस. टी. सह) रकमेच्या खर्चास व या वाढीव कामाकरिता ६ महिने मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक द्वारे मंजूर करण्यात आलेला आहे.

सदर मुदतवाढीचा प्रस्ताव मंजूर करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

**टिप** :-

१) मा. आयुक्त यांनी दि.०४/११/२०२५ अन्वये मंजुरी प्रदान केलेली आहे.
२) पद क्र. A26001630803 अंतर्गत वर्ष २०२५-२६.
३) सविस्तार टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक** :- 377/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक** :- 11/11/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त (उद्यान), उद्यान व वृक्ष प्राधिकरन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर शहरातील म.न.पा. च्या विविध उद्यानात ग्रीन जिम साहित्यांची दुरुस्ती करणेबाबत.

नागपुर शहरातील झोन क्र.01 ते 10 अंतर्गत म.न.पा. च्या विविध उद्यानात ग्रीन जीम साहित्य लावण्यात आलेली आहेत. या सर्व ग्रीन जीम साहित्यांचा देखभाल कालावधी संपुष्टात आलेला आहे. त्यामुळे या साहित्यांची देखभाल व दुरुस्ती विभागाकडून करणे आवश्यक आहे.

सदर ग्रीन जीम दुरुस्ती करण्याच्या कामाची निविदा मागविली असता निविदाकार मे. रचित सेल्स, नागपूर यांची प्राकलनीय दरापेक्षा १३.२०% टक्के कमी दरांची रु. ६६,०६,४७७/- किमतीची निम्नतम निविदेला मंजुरी प्रदान करण्यात आली.

या कामाचे कंत्राटदार मे. रचित सेल्स, नागपूर यांनी दि.११/०३/२०२५ पर्यंत झोन क्र.०१ ते १० अंतर्गत म.न.पा. च्या विविध उद्यानातील ग्रीन जीम साहित्य दुरुस्ती करण्याचे काम पूर्ण केलेले आहे. सदर कामाचा कार्यादेश कालावधी पूर्ण झालेला आहे. ग्रीन जीम दुरुस्तीच्या कामाचे नवीन कंत्राट मंजूर होऊन कार्यादेश होईपर्यत या साहित्यांची देखभाल व दुरुस्ती विभागाकडून करणे आवश्यक आहे. त्या करिता ६ महिन्यासाठी अंदाजे राशी रु. ३३,८३,५९५/- चे प्राकलन तयार करण्यात आले असून पद क्र. A26001630803 अंतर्गत प्रावधान देण्यात आले आहे.

करिता झोन क्र. ०१ ते १० अंतर्गत म.न.पा. च्या विविध ग्रीन जीम साहित्यांची देखभाल व दुरुस्ती करण्याचे कामाकरिता लागणाऱ्या राशी रु.३३,८३,५९५/- (जी. एस. टी. सह) रकमेच्या खर्चास व या वाढीव कामाकरिता ६ महिने मुदतवाढ देण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मान्यता प्रदान केली.